महासागर
e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com

# उपचाराअभावी गोमातेचा मृत्यू

**मलकापूर (महासागर प्रतिनिधी)** – शहरातील गौरक्षण संस्थेचा निष्क्रिय व बेजबाबदार कारभार पुन्हा एकदा उघडकीस आला आहे. मागील तीन दिवसांपासून बिरला रोडवरील पटवारी कार्यालयाच्या बाजूला एक गोमाता गंभीर आजारी अवस्थेत पडून होती. स्थानिक नागरिकांनी वारंवार गौरक्षण संस्थेशी संपर्क साधून या गोमातेच्या उपचारांची विनंती केली. मात्र संबंधित संस्थेकडून कोणतीही दखल घेतली गेली नाही. योग्य उपचार व वेळेवर मदत न मिळाल्यामुळे अखेर या गोमातेची प्राणज्योत मालवली. या घटनेमुळे शहरातील नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. गौरक्षणाच्या नावाखाली कार्यरत असलेल्या संस्थांनी केवळ नावापुरते नव्हे, तर प्रत्यक्ष कामातून आपली जबाबदारी पार पाडावी, अशी मागणी होत आहे. या गंभीर घटनेची शहर प्रशासनाने व सामाजिक संघटनांनी तातडीने दखल घ्यावी. भविष्यात अशा प्रकारची घटना घडू नये यासाठी गौरक्षण संस्थेच्या कार्यपद्धतीवर लक्ष ठेवणे व आवश्यक ती कारवाई करणे गरजेचे असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

# राजमाता माँ जिजाऊ जन्मोत्सव सोहळ्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवा

## जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांचे निर्देश विविध विभागांच्या पूर्वतयारीचा घेतला आढावा



**बुलढाणा (जिमाका)** : राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्यावतीने राजमाता जिजाऊ माँ साहेब यांच्या जयंतीनिमित्त सिंदखेड राजा येथे तीन दिवसीय माँ जिजाऊ जन्मोत्सव सोहळा आयोजित करण्यात येणार आहे. या जन्मोत्सव सोहळ्यासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज ठेवा, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी अधिकाऱ्यांना दिले.

या जन्मोत्सव सोहळ्याच्या आयोजनाबाबत जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिजाऊ कक्षात बुधवारी बैठक घेण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते.

जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी बैठकीच्या सुरुवातीला शासकीय यंत्रणांची तयारी आणि भाविकांसाठीच्या सोयीसुविधांविषयी सविस्तर माहिती घेतली. यावेळी ते म्हणाले की, आगामी जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकांच्यादृष्टीने कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील आणि सोहळ्याला कोणताही गालबोट लागणार नाही याची दक्षता घ्यावी. पायाभूत सुविधा निर्मितीसाठी निधी उपलब्ध करुन दिला आहे. जन्मोत्सव कालावधीत २४ तास वीज पुरवठा राहील, लोडशेडींग व शॉर्टसर्कीटचे प्रकार होणार नाही याची दक्षता महावितरण विभागाने घ्यावी. अग्निशन दलाने कार्यक्रम, गर्दी व पार्कीगच्या ठिकाणी वाहने तैनात ठेवावी. कचरा व्यवस्थापन, पाणीपुरवठा व स्वच्छता व्यवस्थापन, शौचालय सुविधांसाठी नगरपालिका प्रशासनाने नियोजन करावे. सोहळ्यासाठी येणाऱ्या वाहनांसाठी पार्किंग व्यवस्था करावी. यासोबतच पोलीस बंदोबस्त, वाहतूक नियंत्रण आणि गर्दी नियंत्रणासाठी व्यवस्था करावी. भाविकांची गैरसोय होणार नाही याची काळजी घ्यावी. राज्यभरातून येणाऱ्या भाविकांसाठी एसटी महामंडळाने जादा बसेस सुरु कराव्यात. सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटिव्ही यंत्रणा, पोलीस नियंत्रण कक्ष, मदत कक्ष, उद्घोषणा यंत्रणा आणि आरोग्य यंत्रणा कार्यरत ठेवावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी यावेळी दिले. याबैठकीत मुख्य कार्यकारी अधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांनी देखील भाविकांच्या सुर-क्षेच्या दृष्टीने सूचना केल्या.

या बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे, अपर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड, उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे, जिल्हा सह आयुक्त जी एस पेंटे, उपविभागीय पोलीस अधिकारी मनीषा कदम, कार्यकारी अभियंता जितेंद्र काळे, तहसिलदार, मुख्याधिकारी, मराठा सेवा संघाचे राज्य संघटक मनोहर तुपकर, जिल्हाध्यक्ष रविंद्र चेके, व्यवस्थापक सुभाष कोल्हे यांच्यासह महावितरण, अग्निशमन, नगरविकास, आरोग्य, एसटी महामंडळ आदी विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# दे. मही परिसरात सोन्याचे बिस्किट दाखवून महीलेची फसवणूक

## अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका - पो.नि.ब्रह्मगिरी.

**देऊळगाव राजा (महासागर प्रतिनिधी)** : सोन्यासारखे दिसणारे बिस्कीट दाखवून ज्येष्ठ महिलेची फसवणूक करून तिच्याकडील सोन्याचे दागिने लंपास केल्याची धक्कादायक घटना २८ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी सुमारे २ वाजताच्या सुमारास देऊळगाव मही परिसरात घडली. या प्रकरणी देऊळगाव राजा पोलीस ठाण्यात अज्ञात दोन इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून परिसरात खळबळ उडाली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, सुमनबाई साहेबराव चेके (वय ६५, रा. सरंबा, ता. देऊळगाव राजा) या देऊळगाव मही येथे असताना दोन अज्ञात इसमांनी त्यांच्याशी गोड बोलून संवाद सुरू केला. आरोपींनी आपल्या हातातील सोन्यासारखे चमकणारे बिस्कीट दाखवत ते खरे सोने असल्याचा आव आणून फिर्यादीचा विश्वास संपादन केला. विश्वासात घेतल्यानंतर आरोपींनी फिर्यादीच्या गळ्यातील सोन्याची पोथ ( अंदाजे १६ हजार रुपये) तसेच कानातील सोन्याची फुले (अंदाजे १६ हजार रुपये) असे एकूण ३२ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने चलाखीने काढून घेतले. त्याबदल्यात फिर्यादीस बनावट सोन्यासारखे बिस्कीट देऊन दोन्ही आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. थोड्याच वेळात आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच सुमनबाई चेके यांनी तातडीने देऊळगाव राजा पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. त्यांच्या तक्रारीवरून पोलीसांनी भारतीय न्याय संहिता कलम ३१८, ३ (५) अंतर्गत अज्ञात दोन आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार ब्रह्मगिरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार कलीम देशमुख करीत आहेत. आरोपींचा शोध घेण्यासाठी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात असून पोलीसांनी तपासाला वेग दिला आहे. दरम्यान, अशा प्रकारच्या फसवणुकीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने नागरिकांनी, विशेषतः ज्येष्ठ नागरिकांनी अनोळखी व्यक्तींवर विश्वास ठेवू नये, कुठल्याही आमिषाला बळी न पडता सतर्क राहावे, असे आवाहन देऊळगाव राजा पोलीस प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# काकणवाडा बु. येथे बिबट्याचा धुमाकूळ! ५ शेळ्या ठार तर गायीचाही मृत्यू

**संग्रामपूर (महासागर प्रतिनिधी)**:- तालुक्यात गेल्या तिन आठवड्यापासून ग्रामीण भागातील शेत शिवारात बिबट्याचा वावर होत असून अद्यापही त्याचा शोध लागत नाही. दोन दिवसापूर्वी एका शेतकऱ्याचे गायीचा पडशा पाडला. अन् आज ३१ डिसेंबर रोजी तालुक्यातील एका शेतकऱ्याच्या गोठ्यातील शेळ्यांवर बिबट्याने हल्ला करुन ५ शेळ्यांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे शेतकरी ,शेतमजूर विशेषतः महिला मजूर भयभित झाले आहेत.

ह्याबाबत प्राप्त माहिती अशी की, संग्रामपूर तालुक्यात गेल्या काही दिवसापूर्वी काटेल कोलद शिवारात तसेच तीन आठवड्यापासून पातुर्डा परिसरातील कोद्री व संग्रामपूर शिवारातही पांडव नदीचे काठावरील हरभरा शेतात प्रवेश केल्याने बिबट्या दिसून आला . त्यानंतर गेल्या दोन दिवसा पूर्वी बोडखा शिवारात फिरत असतांना काथरगाव पिंप्री येथील कैलास टापरे यांचे गायीवर हल्ला करुन गाय मृत्यू मुखी पडली.

आज ३१ डिसेंबर रोजी सकाळी एका बिबट्याचा वावर होवून काकणवाडा बु. येथील रहिवासी गजानन देवराव हिप्परकार यांच्या जनावरांचे कोठ्यात असलेल्या शेळ्यावर बिबट्याने हल्ला करुन ह्या हल्ल्यात ५ शेळ्या जागीच ठार झाल्या असून परिसरात शेतकरी , शेतमजूर, पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

ह्यापूर्वी सदर घटनेची माहिती देवून दोन गावांचे शिवारात वन विभागाचे वतीने कमेरा लावूनही बिबट्या आढळून आला नाही. ३१ डिसेंबर रोजी सदर घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी वनविभागाला कळवले असून वारंवार बिबट्याचे दर्शन होत असल्याने शेतकरी, शेतमजूर व पशुपालकांमध्ये मोठी दहशत पसरली आहे. ह्यावर वनविभागाचे संबंधित अधिकारी , कर्मचारी ह्यांनी त्वरीत लक्षदेवून उपाययोजना करावी. अशी मागणी तालुक्यातील शेतकरी, शेतमजूर व नागरिकांकडून होत आहे.

तालुक्यात सध्या रब्बी पिकृ हंगाम सुरु असल्याने व विद्युत वितरण कंपनीने काही भागात रोटेशन प्रमाणे रात्रीच्या वेळीच लाईन सुरु ठेवण्याचा निर्णय घेतल्याने आपले पिक यावे ह्याकरीता रात्र पाळीला पिकांना पाणी देण्यासाठी जावे लागते. त्यामुळे खरे काबाडकष्ट करणारे शेतकरी तसेच शेतमजूर येण्यास घाबरत आहेत तर दिवसा शेतमजूर महिलाही घाबरत आहेत. तरी वनविभागाने लक्षदेवून बिबट्याचा बंदोबस्त करावा. अशी मागणी तालुक्यातून होत आहे.

# बसस्थानकासमोर युवकाकडून गांजा जप्त

**खामगाव (का.प्र.)** :स्थानिक बसस्थानकासमोर एक युवक गांजा बाळगून असल्याची गोपनीय माहिती मिळाली असता काल २९ डिसेंबर २५ रोजी दुपारी ३.५२ वाजताच्या सुमारास शहर पोस्टेचे ठाणेदार रामकृष्ण पवार यांनी नायब तहसीलदार सोनाली भाजीभाकरे व पंचांसमक्ष घटनास्थळी छापा मारून सदर युवकास ताब्यात घेतले. आरोपीचे नाव चेतन राजेश चुनेकर (वय १९ रा. रेखा प्लॉट सतीफैल) असे असून त्याचे जवळून १६८ ग्रॅम गांजा (किं.अं. ३ हजार रू.), रोख २ हजार २७० व मोबाईल (किं. ५ हजार) असा एकूण १० हजार २७० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी ठाणेदार रामकृष्ण पवार यांनी शहर पोस्टेला फिर्याद दिली. फिर्यादीवरून पोस्टेमध्ये उपरोक्त आरोपीविरूध्द गुन्हा दाखल केला. पुढील तपास सपोनि विकास पाटील करीत आहेत.

# वनविभागाची मोठी कारवाई; ७५ लाखांचा गुटखा जप्त!



**जळगाव जामोद (महासागर प्रतिनिधी)**:- मध्यप्रदेशातून महाराष्ट्रात अवैधरित्या आणला जाणारा तब्बल ७५ लाख रुपये किमतीचा विमल गुटखा आणि पान मसाला वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी जप्त केला आहे. मात्र, या कारवाईनंतर जळगाव जा. पोलिसांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून पोलिसांनी या प्रकरणाचे वार्तांकन करणाऱ्या पत्रकारांना दुय्यम वागणूक दिल्याने खळबळ उडाली आहे.

तालुक्यातील सातपुडा पायथ्याशी असलेल्या वनविभागाच्या नाक्यावर वन कर्मचारी गस्तीवर होते. रात्री १ ते २ वाजेच्या सुमारास मध्यप्रदेशकडून महाराष्ट्रात प्रवेश करणाऱ्या एका आयशर ट्रकची (क्र.३० ७५८५) संशयावरून तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान ट्रकमध्ये मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटखा आढळून आला. वनविभागाने तत्काळ स्थानिक पोलिसांना पाचारण केले आणि ट्रक पोलीस स्टेशनला लावण्यात आला. या कारवाईमध्ये गुटखा मालक यास सह आरोपी न करता ठाणेदार नितीन पाटील यांनी आयशर ट्रक चालक राजू गवांदे रा.खामगाव वय ४० याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

**पोलिसांचा 'अर्थपूर्ण' कारभार आणि संशयास्पद भूमिका.**– जळगाव जा.पो.स्टे हद्दीतून दररोज मोठ्या प्रमाणावर गुटख्याची अवैध वाहतूक होत असतानाही पोलीस त्याकडे 'अर्थपूर्ण' दुर्लक्ष करत असल्याचे बोलले जात आहे. या कारवाईतही पोलिसांची भूमिका संशयास्पद राहिली आहे. चोर सोडून संन्याश्यास फाशी अशी अवस्था ठाणेदार नितीन पाटील यांनी केली आहे.

**व्हिडिओ चित्रीकरणास टाळाटाळ:** गाडीतून गुटखा खाली करताना संपूर्ण प्रक्रियेचे अधिकृत व्हिडिओ चित्रीकरण करणे आवश्यक असताना पोलिसांनी तसे केले नाही. आरोपींना कायद्यानुसार ताब्यात ठेवण्याऐवजी, ठाणेदार नितीन पाटील यांनी चक्क आरोपीच्या हातुन गुटखा खाली केल्याचे समोर आले आहे.

**लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाला दुय्यम वागणूक**– या मोठ्या कारवाईचे वार्तांकन करण्यासाठी गेलेल्या पत्रकारांना जळगाव जा. पोलिसांनी अत्यंत दुय्यम आणि अपमानास्पद वागणूक दिली. कारवाई पारदर्शक ठेवण्याऐवजी ती दडपण्याचा प्रयत्न पोलिसांकडून होत असल्याचे दिसून आले. माहिती देण्यास टाळाटाळ करणे आणि पत्रकारांना सहकार्य न केल्यामुळे पोलीस नेमके कोणाला वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. तालुक्यात गुटखा माफियांचे जाळे पोलिसांच्या आशीर्वादानेच फोफावत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. वनविभागाने ही कारवाई करून पोलिसांच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह उभे केले आहे. याप्रकरणी जिल्हा पोलीस अधीक्षकांनी लक्ष देऊन, जळगाव जामोद पोलीस प्रशासन आणि गुटखा माफियांचे असलेले लागेबांधे शोधून काढून संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी सुज्ञ नागरिक करत आहेत.

# ओम साई फाउंडेशन जीवन रक्षक टीम यांच्या शोध कार्याला यश बेपत्ता झालेल्या इसमाचे प्रेत १० दिवसानंतर नदीपत्रात आढळले

**नांदुरा (महासागर प्रतिनिधी)**–२१ डिसेंबर रोजी दुपारी ४ दरम्यान ज्ञानगंगा व पूर्णा येरळी संगमजवळ नदीपात्रामध्ये हरिभाऊ दयाराम हरमकर वय अंदाजे ४० वर्ष राहणार निंभोरा हल्ली मुक्काम रोटी हे बेपत्ता झाले होते सदर इसमाला शोधण्यासाठी माननीय जिल्हाधिकारी किरण पाटील यांच्या आदेशानुसार व संभाजी पवार,पोलीस उपनिरीक्षक तारासिंग पवार, आपत्ती व्यवस्थापन पथक बुलढाणा व ओमसाई फाउंडेशन जिवन रक्षक टीम नांदुरा घटनास्थळी यांच्या व गावकऱ्यांच्या संयुक्त विद्यमाने शोध मोहीम सुरू करण्यात आली होती.सर्व गावकऱ्यांच्या सहकार्याने शोध मोहीम करूनही संध्याकाळी:उशिरापर्यंत शोध घेऊनही शोध लागला नसल्याने संध्याकाळी उशिरा शोध म्हणून थांबवण्यात आली होती. अखेर १० दिवसानंतर सदर इसमाचे प्रेत संगमेश्वर मंदिर दरम्यान आढळले.यावेळी रेस्क्यू करण्यासाठी ओमसाई फाउंडेशन नांदुराची जिवन रक्षक टीम, अध्यक्ष विलास निबोळकर, आश्विन फेरण,नितीन ठाकरे, कृष्णा वसोकार, विष्णू धांडे, वैभव राहणे,राहुल निमकर्डे, श्रीराम निबोळकर,शिवा हुरपडे,पंडित उगले, गौरव उगले,श्रीराम ठाकरे,बाळु राऊत, नांदुरा पोलीस स्टेशनचे पोलीस हेडकॉन्स्टेबल गजानन इंगळे संजय वराडे, पोलीस उपनिरीक्षक सुनील देव,जयेश शिनगारे,गोरले सदर घटनेची माहिती नांदुरा तहसीलदार अजितराव जंगम यांनी ओम साई फाउंडेशनला दिली असता सदर मदत कार्य करण्यात आले सदर कुजलेल्या अवस्थेत असलेल्या प्रेताचे घटनास्थळावरच प्राथमिक आरोग्य केंद्र नांदुराच्या वैद्यकीय अधिकारी फिरदोस यास्मिन यांच्या उपस्थितीत शवविच्छेदन करून घटनास्थळावरच अंत्यविधी करण्यात आला असल्याचे ओमसाई फाउंडेशन नांदुराच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# रुग्णवाहिका चालकांवर उपासमारीची वेळ... २१ महिन्यांपासून मानधन रखडले, चालक आत्मदहनाचा इशारा

**लोणार (महासागर प्रतिनिधी)**: जिल्ह्यातील १०२ रुग्णवाहिका सेवेत कार्यरत असलेल्या तात्पुरत्या (कंत्राटी) वाहन चालकांना गेल्या २१ महिन्यांपासून वेतन न मिळाल्याने त्यांच्या कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. वेतन थकबाकी बाबत वारंवार निवेदने, उपोषण तसेच तोंडी आश्वासने देऊनही कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने अखेर चालकांनी आत्मदहनाचा इशारा दिला आहे. याबाबतचे निवेदन प्रकाश आबिटकर, आरोग्यमंत्री, महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई यांना पाठविण्यात आले आहे.

याप्रकरणी देण्यात आलेल्या निवेदनात १०२ रुग्णवाहिका चालकांना देय असलेले वेतन अद्याप अदा करण्यात आलेले नाही. परिणामी चालकांचे दैनंदिन जीवन अत्यंत हालाखीचे बनले असून अनेक कुटुंबांना मूलभूत गरजांसाठीही संघर्ष करावा लागत आहेत, तर रुग्णवाहिका चालकांनी २१ महिन्यांचे थकीत वेतन त्वरित अदा करावे, कामावरून कमी करण्यात आलेल्या सर्व कंत्राटी वाहन चालकांना पुन्हा सेवेत घ्यावे, माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार 'समान कामास समान वेतन' लागू करावे, दरमहा वेतन ५ तारखेच्या आत अदा करावे. कामाचा वेळ ८ तास निश्चित करावा, आदी मागण्यांचा समावेश आहे.

तथापि, ग्रामीण रुग्णालय लोणार येथे जिल्हा शल्य चिकित्सक यांच्यामार्फत कार्यरत असलेले वाहन चालक गजानन दत्ताराव देशमुख यांनी दिलेल्या माहितीनुसार, यापूर्वी जिल्हा शल्य चिकित्सक, बुलढाणा यांच्याकडे अनेक वेळा लेखी निवेदने देण्यात आली होती. उपोषणानंतर १५ दिवसांत १८ महिन्यांचे वेतन देण्याचे तोंडी आश्वासन देण्यात आले होते; मात्र सहा महिने उलटूनही वेतन न मिळाल्याने चालकांना कामावरून कमी करून घरी बसविण्यात आल्याचा आरोप करण्यात आला. त्यामुळे २२ जानेवारीपर्यंत वेतन न मिळाल्यास २५ जानेवारी २०२६ रोजी रात्री १२ वाजता आरोग्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई– ३२ येथे आत्मदहन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. याप्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा, जिल्हा शल्यचिकित्सक सामान्य रुग्णालय बुलढाणा तसेच उपसंचालक, आरोग्य सेवा अकोला मंडळ यांना प्रती पाठवून तातडीने हस्तक्षेप करून थकीत वेतन अदा करावे व सर्व चालकांना पुन्हा सेवेत रुजू करावे, अशी कळकळीची मागणी करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, गर्भवती महिला व नवजात बालकांच्या सुरक्षिततेसाठी शासनाने सुरू केलेली १०२ रुग्णवाहिका सेवा संबंधितांच्या दुर्लक्षामुळे गेल्या जवळपास एका महिन्यापासून बंद असल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील गरोदर माता व रुग्णांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, १०२ रुग्णवाहिका सेवा तात्काळ सुरू करण्याची मागणी तालुकाभरातून जोर धरत आहे.

# बाजार समिती शेतकऱ्यांसाठी की व्यापाऱ्यांच्या संरक्षणासाठी?

## जिल्हाध्यक्ष निलेश नारखेडेंचा संतप्त सवाल

**मलकापूर (महासागर प्रतिनिधी)** : ''शेतकऱ्याची तूर बाजारात उतरते, पण दर उतरतो; व्यापाऱ्याचा नफा वाढतो आणि बाजार समिती प्रशासन गप्प बसतेहे नेमके कुणाच्या हिताचे राज्य आहे?'' असा थेट, घणघणीत सवाल उपस्थित करत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवक जिल्हाध्यक्ष निलेश नारखेडे यांनी मलकापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यपद्धतीवर जोरदार हल्लाबोल केला आहे. तुरीच्या खरेदीत शेतकऱ्यांची उघड लूट सुरू असताना प्रशासन कुंभकर्णी झोपेत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला.

शासन जाहीर करते हमीभाव, मात्र मलकापूर बाजार समितीत तो केवळ कागदावरच उरल्याचे वास्तव आहे. तूर खरेदी हमीभावाने न करता व्यापाऱ्यांच्या मनमानी दराने केली जात आहे. या लुटीला आळा घालण्याची जबाबदारी असलेले बाजार समिती प्रशासन मात्र मूकदर्शकाची भूमिका बजावत असल्याचा आरोप स्वाभिमानी शेतकरी संघटनेने केला आहे.

शेतकऱ्याच्या श्रमाचा योग्य मोबदला मिळावा यासाठी स्थापन झालेल्या बाजार समितीतच जर शेतकऱ्याची लूट होत असेल, तर ही व्यवस्था नेमकी कोणासाठी काम करते, असा प्रश्न उपस्थित होत आहे. प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे व्यापाऱ्यांचे फावले असून शेतकरी मात्र आर्थिक कोंडीत सापडला आहे.

अधिक संतापजनक बाब म्हणजे बाजार समितीतील अमानवी अवस्था. शेतकऱ्यांसाठी शुद्ध पिण्याचे पाणी नाही, बसण्यासाठी साधी व्यवस्था नाही, शौचालयांचा अभाव आहे. दिवसभर उन्हात रांगेत उभा राहणाऱ्या शेतकऱ्याला माणूस म्हणून वागणूक देण्याचीही तसदी प्रशासन घेत नसल्याची तीव्र टीका करण्यात आली आहे. ही केवळ निष्काळजीपणा नसून शेतकऱ्यांप्रती असलेली असंवेदनशील मानसिकता असल्याचे नारखेडे यांनी स्पष्ट केले. यावर कळस म्हणजे बाजार समितीतील तोल काटा बंद अवस्थेत असणे. वजनात पारदर्शकता नसताना व्यवहार सुरू ठेवणे म्हणजे शेतकऱ्याच्या खिशावर थेट डल्ला मारण्यासारखे आहे. यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असताना प्रशासन मात्र डोळेझाक करत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.



या सर्व मुद्द्यांवर स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने कृषी उत्पन्न बाजार समिती प्रशासनाला निवेदन देण्यात आले आहे. मात्र, तात्काळ हमीभावाने तूर खरेदी सुरू न झाल्यास आणि मूलभूत सुविधा उपलब्ध करून न दिल्यास आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा स्पष्ट इशारा युवक जिल्हाध्यक्ष निलेश नारखेडे यांनी दिला आहे. गरज पडल्यास बाजार समितीवर धडक मोर्चा, रास्ता रोको आणि तीव्र आंदोलन छेडले जाईल, असेही त्यांनी ठामपणे सांगितले. या वेळी जिल्हा उपाध्यक्ष बाळू ठाकरे, गोपाल रायपूरे, तालुकाध्यक्ष गोपाल सातव, विश्वास होले, प्रमोद पाटील, सुरेश चौधरी, विनोद सरोदे, सीताराम ढोन, भगवान संबारे, संदीप खाचणे, कुंदन पाटील, सचिन देशमुख, अनिल घाटे, राहुल इंगळे, प्रतिक होले, सारंग खर्चे, दिपक पाटील यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते. हा प्रश्न केवळ तुरीच्या दराचा नाही, तर शेतकऱ्याच्या स्वाभिमानाचा आहे. बाजार समितीने तात्काळ जागे होऊन व्यापाऱ्यांच्या मनमानीला आवर घालावा, हमीभावाने खरेदी सुरू करावी आणि शेतकऱ्यांसाठी किमान सुविधा उपलब्ध करून द्याव्यातअन्यथा शेतकरी शांत बसणार नाही, हे प्रशासनाने लक्षात घ्यावे.

# जिल्ह्यात थंडीचा कडाका वाढला

**बुलडाणा (महासागर प्रतिनिधी)**: जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून थंडीचा जोर वाढत असून पहाटे आणि सकाळ– संध्याकाळ गारठा प्रकर्षाने जाणवत आहे. न्यूनतम तापमानात झालेल्या घसरणीमुळे नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर थंडीचा परिणाम दिसून येत आहे. पहाटेच्या वेळी दवबिंदूमुळे गारठा जाणवू लागला असून सकाळ व संध्याकाळी थंड वारे वाहत आहेत. विदर्भातील अनेक भागांच्या तुलनेत बुलढाण्याची समुद्रसपाटीपासूनची उंची सुमारे २,१९० फुट असल्याने येथे थंडीचा परिणाम अधिक तीव्रतेने जाणवत आहे. न्यूनतम तापमानात झालेल्या घसरणीमुळे पहाटे घराबाहेर पडताना नागरिक स्वेटर, जॅकेट, शालींचा आधार घेताना दिसत आहेत. थंडीमुळे शहरातील बाजारपेठांमध्ये सकाळची वर्दळ काहीशी मंदावली असून चहा, कॉफी व गरम नाश्त्याच्या गाड्यांवर गर्दी वाढल्याचे चित्र दिसून येत आहे. ग्रामीण भागात जनावरांना थंडीपासून संरक्षण मिळावे, यासाठी शेतकरी त्यांना गोठ्यातच ठेवण्याकडे अधिक भर देत आहेत.

